# प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
# कर्जत–४१०२०१, जि. रायगड

जा.क्र.प्राकृसंकें/एकृप/ 2271/२०२१, दिनांक : १२/१०/२०२१

## जाहिर प्रसिध्दी 12 OCT 2021

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील अखिल भारतीय समन्वित एकात्मिक कृषिपध्दती संशोधन प्रकल्पांतर्गत आय.एफ.एस. मॉडेल संशोधन प्रकल्पामधील कामे निव्वळ कंत्राटी पध्दतीने खरीप–२०२१व रब्बी–उन्हाळी २०२१–२०२२ या हंगामाकरीता (०१ नोव्हेंबर २०२१ ते ३१डिसेंबर २०२१) करावयाची आहे. सदरची कामे करण्यास इच्छुक असणाऱ्या अनुभवी कंत्राटदारांनी आपले दरपत्रक या कार्यालयास दिनांक २६/१०/२०२१ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे. सोबत कामाच्या अटी व शर्ती आपल्या माहितीसाठी जोडण्यात आलेल्या आहेत.

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत–४१०२०१जि. रायगड

प्रत प्रसिध्दीसाठी–

१. म.मुख्याधिकारी, नगर परिषदकार्यालय,कर्जत, जि रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
२. मा.तहसिलदार, तहसिल कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
३. मा.गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,कर्जत, जि रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
४. नोटीस बोर्ड, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड.
५. संकेतस्थळ, डॉ.बा.सा.को.कृ.वि.दापोली

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील एकात्मिक कृषिपध्दती संशोधन प्रकल्पांतर्गत आय.एफ.एस. मॉडेल प्रक्षेत्राची कामे ठेका पध्दतीने करावयाच्या कामांचे दरपत्रक

दिनांक :

प्रति,

मा. सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड

विषय : प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील अखिल भारतीय समन्वित एकात्मिक कृषिपध्दती संशोधन प्रकल्पांतर्गत आय.एफ.एस. मॉडेल प्रक्षेत्रावर प्रायोगिक पिकांची विविध कामे ठेका पध्दतीने करण्यासाठीचे दरपत्रक.

संदर्भ : जा.क्र.प्राकृसंकें/एकृप/ / /२०२१ दि.१२/१०/२०२१

महोदय,

वरील संदर्भीय जाहीर प्रसिध्दी पत्रकान्वये प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील अखिल भारतीय समन्वित एकात्मिक कृषिपध्दती संशोधन प्रकल्पांतर्गत आय.एफ.एस. मॉडेल प्रकल्पामध्ये प्रायोगिक पिकांची कामे ठेका पध्दतीने पूर्ण करण्यासाठीचे दरपत्रक खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| कामाचा तपशिल | सन २०२१ – २०२२ हंगामासाठी<br>(०१ नोव्हेंबर २०२१ ते ३१डिसेंबर २०२१) |
|---|---|
| सोबतच्या यादीमध्ये नमूद केलेल्या कामासाठीचे दरपत्रक | रूपये...................................<br>अक्षरी ................................. |

दरपत्रका सोबतच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.तरी कृपया माझे दरपत्रक मंजुर करावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सही :

नांव :

पत्ता :

**ठेकेदाराबाबतच्या सर्व साधारण अटी व शर्ती**

१. प्रक्षेत्रावरील कामे संबंधीत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार ठेवून दैनिक त्याप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२. कामाच्या देयकाची आकारणी महिना पूर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख/ प्रक्षेत्र अधिकारी यांचे काम केलेले पूर्ण झाल्याबाबतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

३. निविदांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

४. ठेकेदाराकडे स्वतःचे पॅन कार्ड व बँक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्याअनुषंगीक रक्कम संबंधीत कामगारांच्या बँक खाती जमा करणे आवश्यक आहे.

५. ठेकेदाराने नेमलेल्या मजुरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले आहे असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

६. प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडून नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

७. ठेक्यामध्ये असलेल्या मजुरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार अन्य मजूर विहीत कार्यपध्दती अवलंबून नेमण्याचा अधिकार संबंधित विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना राहील.

८. ठेक्यातील मजुरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चीत केलेली असावी.

९. याचिका क्र. १५९९/२०१८ संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या दिनांक १८ एप्रिल, २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीचे अनुपालन परिच्छेद क्र. ५९ (ई) नुसार याचिकाकर्त्या मजुरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

१०. ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

११. ठेकेदार व्यक्तीस/संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१२. ठेक्यासंबंधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना/विद्यापीठ प्रशासनाला राहतील.

ठेकेदाराची सही :.................................

ठेकेदाराचे नांव:.......................................

एकात्मिक कृषिपध्दती संशोधन प्रकल्पांर्तगत आय.एफ.एस. मॉडेल संशोधन प्रकल्प प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड दि. ०१.११.२०२१ ते दि. ३१.१२.२०२१ या कालावधीत करावयाच्या कामांचीयादी.

१. शेळी व कोंबडी संगोपन करणे.
२. कर्जत—३ भात पिकांमधील भेसळ काढणे भात पिकाची कापणी करणे भारे बांधणे व मळणी करून भात साफ करणे.
३. नागली व वरी पिकाची बोंड कापणी करणे. काड कापणी करणे मळणी करणे.
४. कांदा बी पेरणी व लागवड करणे.
५. काकडी पिकाची काढणी करणे व विक्री करणे तसेच रब्बी—उन्हाळी २०२१—२०२२ या हंगामामधील पिकाची पेरणी करण्यासाठी पुर्व तयारी करणे.
६. भेंडी पिकाची काढणी करणे व विक्री करणे.
७. प्रक्षेत्रावरील कंदपिकाची काढणी करणे. व प्रक्षेत्रावर मधुमका, मुग,चवळी,मोहरी,दुधीभोपळा,वाली,पालेभाजी,भेंडी इत्यादी पिकाची पेरणी करणे.
८. प्रक्षेत्रावरील करवंद, जांभुळ, नारळ व इतर फळ झाडाच्या बुंध्यालगतचे गवत व बांधावरील कुंपणा लगतचे गवत काढुन साफ सफाई करणे.
९. गायी, शेळी व कोंबडी शेडच्या सभोवतालील झाडे झुडपे तसेच गवत काढुन परिसर स्वच्छ ठेवणे.
१०. नेपीयर बाजरा चारा पीकमधील गवत काढणे तसेच दैनदिन चारापिकाची कापणी करून गुरांना खाण्यस देणे.
११. हापुस आंबा तसेच आवळा बागेतील गवत काढुन साफसफाई करणे. तसेच गांडूळ खत बेडचे व्यवस्थापन पाहणे.
१२. प्रक्षेत्रावरील कुंपण दुरूस्ती करणे तसेच प्रक्षेत्राच्या बाधांवर हापूस आंबा बाग, आवळा बाग इत्यादी ठिकाणी तणनाशक औषधांची फवारणी करणे.
१३. पशुसंवर्धन संदर्भात आयत्यावेळी उद्‌भवणारी कामे करणे.

ठेकेदाराची सही :..................................

ठेकेदाराचे नांव:......................................